


# शेपट्या

हायड्रोज आलुवा

चित्रे

अतनू रॉय

ISBN 81-237-0962-5


पहिली आवृत्ती : 1994
दुसरी आवृत्ती : 1995 (*शके* 1917)
तिसरी आवृत्ती : 1999 (*शके* 1920)
चौथी आवृत्ती : 2001 (*शके* 1923)
पाचवी आवृत्ती : 2003 (*शके* 1924)


मूळ © हायड्रोज आलुवा
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1994

Tails *(Marathi)*

**रु. 12.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.





नेहरू बाल पुस्तकालय

# शेपट्या

हायड्रोज आलुवा


अनुवाद

सुषमा सोनक

चित्रे


अतनू रॉय

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



या जगात किती किती प्रकारचे प्राणी आहेत.
गाय, कुत्रा, माकडं, खारी, कांगारु
अशासारख्या खूप प्राण्यांना शेपट्या असतात.
जगातील यच्चावत सगळ्या माशांना, प्रचंड
देवमाशांपासून ते अगदी चिंगुल्या माशांना पण
शेपट्या असतात बरं.







मोर, पोपट, शहामृगासारख्या पक्ष्यांनाही
शेपट्या असतात. अन् पाली आणि
विंचवांनाही असतात हं.







पहावे त्या शेपटीचा आकार वेगळा. बाज आगळा.
यांचे उपयोगदेखील नानाविध.



गाईच्या लांब शेपटीच्या टोकाशी झुपका असतो.
माशा आणि इतर कीटकांना हाकायला बरा.

कुत्र्यांच्या जातींनुसार त्यांच्या शेपटाची लांबी आणि आकारही बदलत जातो. आपली खुशी सांगायला कुत्रे शेपूट हलवतात. मात्र घाबरगुंडी उडाली की तेच शेपूट पायात घालतात.







माकडाची शेपटी केवढी लांबलचक आणि सडपातळ असते. या फांदीवरून त्या फांदीवर झेपा घेतांना नेहमीच कसा अचूक तोल साधता येतो त्यांना? हे काम शेपटीचे.






खारीचे शेपूट कसे झुपकेदार आणि लांब असते. या फांदीवरून त्यावर तिची सारखी धावपळ चालते. चटकन उडी घेतांना तीही आपले शेपूट वापरून तोल साधते.

अन् हिवाळ्यात आपल्या शेपटीच्या उबेत अंग गोल वळवून खारूताई कशी बसली आहे बघा.







कांगारूची शेपटी  चांगली जाडजूड आणि
बळकट असते. लांब लांब उड्या मारतांना आपला
तोल सांभाळायला कांगारूंना ती उपयोगी पडते.
आणि दमून भागून तिच्यावर बसता पण येतं.

शेपट्यांवाचून माशांचं तर चाललंच नसतं.
पाण्यात सुळकन इकडून तिकडे जायला,
क्षणात आपली दिशा बदलायला त्यांना
शेपटीचं सुकाणू लागतं.







उड्डाणाची दिशा बदलायला पक्षीही आपली शेपटी वापरतात. याशिवाय शेपटीने नाना ऐटदार खेळ करतात.




आपली लांबलचक शेपटी उभारून मोर
लांडोरीला कसा पिसारा फुलवून दाखवतो.



आणि तुम्हाला पालीच्या शेपटीची गंमत ठाऊकं आहे का? लढतांना तिचं शेपूट तुटलं की ती पळून जाते. नंतर तिला नवीन शेपटी येते.

विंचवाच्या नांगीविषयी तुम्ही ऐकलं असेल नां ?
त्याच्या लांब शेपटीच्या वळलेल्या टोकात नांगी
असते. या नांगीने विंचू चटचट आपलं भक्ष्यं मारतो.







हनुमानाची शेपटी आठवते कां ? रावणाला धडा
शिकवायला आपल्या शेपटीने त्याने सगळी
लंकाच पेटवली.

कोणे एके काळी माणसालाही शेपूट होतं. त्याने त्याचा वापर केला नाही. मग ते आखूड होत होत एक दिवस नाहीसंच झालं.





Printed at Aravali Printers & Publishers Pvt. Ltd., Okhla, Phase-II, N.D.-20

रु. 12.00 ISBN 81-237-0962-5

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

